# ८. पाखरांचे मागणे

**प्रेमचंद अहिरराव** (१९७४) : प्रसिद्ध कवी. विविध मासिके, दैनिके, नियतकालिके यांतून काव्यलेखन व सदर लेखन. पर्यावरण संवर्धनासाठी अनेक उपक्रमांत सहभाग. त्यांची 'शिवगाथा' व 'शंभूगाथा' ही पुस्तके प्रकाशित आहेत.

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात मानव स्वत:च्या सुखसोयीसाठी सृष्टीचा स्वैरपणे वापर करू लागला आहे. कळत नकळत केलेल्या या गोष्टींमुळे सजीव सृष्टीतील वृक्ष, प्राणी यांच्याही अस्तित्वाला धोका पोहोचला आहे. स्वत:च्या प्रगतीबरोबरच प्राणिमात्रांच्या जीवनाचे संरक्षण करण्याविषयीचे मागणे पाखरांच्या माध्यमातून कवीने या कवितेतून व्यक्त केले आहे. प्रस्तुत कविता 'किशोर', एप्रिल २०१८ या मासिकातून घेतली आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

करुणा असूदे सदैव माणसा
तुझ्या हृदयात आमची,
तुझ्याच हातात आहे रे माणसा
दोरी आमच्या आयुष्याची ।।धृ।।

घरे मनासारखी बांधशील तू
तुझ्यासाठी राहायला,
एक झाड लाव अंगणात
आम्हांला रे विश्रांती घ्यायला ।।१।।

भव्य धरणे उभारशील तू
पाणी तुला वापरायला,
ठेव छतावरही थोडे पाणी
आम्हांला रे प्यायला ।।२।।

फुलांची बाग फुलवशील तू
चिमुकल्यांना खेळायला,
वृक्षवेलींनी सजव कमानी
आम्हांला रे झुलायला ।।३।।

कर्कश गाणी ऐकशील तू
मनोरंजन करायला
आनंद आमचा जपून ठेव
आम्हांला रे किलबिलायला ।।४।।

प्राण आमचा वाचवशील तू
मनात ठेवून भूतदयेला,
नाही तर येतील अश्रू डोळ्यांत
आम्हांला रे पाहायला ।।५।।




**शब्दार्थ : सदैव** – नेहमी. **आयुष्याची दोरी** – आयुष्याची मर्यादा. **कर्कश आवाज** – कानांना सहन न होणारा आवाज. **भूतदया** – प्राणिमात्रांवर प्रेम.




## स्वाध्याय

**प्र. १. आकृती पूर्ण करा.**

(अ)




(आ)




**प्र. २. कारणे शोधा.**

(अ) माणूस भव्य धरणे उभारतो, कारण········

(आ) माणूस फुलांची बाग फुलवतो, कारण········

**प्र. ३. खालील अर्थांच्या कवितेतील ओळी शोधून लिहा.**

(अ) आमच्या आयुष्याची मर्यादा तुझ्या हातात आहे. ______________________

(आ) पाखरे नाहीशी झाली तर त्यांचा शोध घेताना डोळ्यांत पाणी येईल. ______________________

**प्र. ४. तुमच्या शब्दांत लिहा.**

(अ) 'आमच्या आयुष्याची दोरी माणसाच्या हातात आहे', असे पाखरे का म्हणत असतील ते लिहा.

(आ) 'नाही तर येतील अश्रू डोळ्यांत आम्हांला रे पाहायला', या ओळीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) कवितेतील शब्द आणि त्यांचे समानार्थी शब्द यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) करुणा | (अ) सुमन |
| (२) आयुष्य | (आ) नयन |
| (३) फूल | (इ) वल्ली |
| (४) वेल | (ई) दया |
| (५) डोळा | (उ) जीवन |



## चर्चा करूया.

- पाखरे नष्ट होण्याच्या कारणांबद्दल मित्रमैत्रिणींबरोबर चर्चा करून त्याची यादी तयार करा व ती वर्गात वाचून दाखवा.



## लिहिते होऊया.

- खालील मुद्द्यांच्या आधारे 'माझा आवडता पक्षी' या विषयावर दहा ते बारा ओळी निबंध लिहा.

**माझा आवडता पक्षी**
- आवडता पक्षी
- निसर्गसंरक्षणात त्याचे काम
- तो आवडण्याची कारणे
- पक्ष्याचे वर्णन
- पक्ष्याची वैशिष्ट्ये

**प्रकल्प :** तुमच्या परिसरात आढळणाऱ्या चार-पाच पक्ष्यांचे निरीक्षण करा. त्यांच्याबद्दलची माहिती वर्तमानपत्रे, पुस्तके, आंतरजाल यांद्वारे मिळवा. मिळवलेल्या माहितीच्या कात्रणांचा संग्रह करून त्यापासून एक चिकटवही तयार करा.



## वाचा.

- खालील उतारा वाचा. त्याचा तुम्हांला समजलेला अर्थ सारांश रूपाने पुन्हा लिहा.

मित्रमंडळींशी गप्पा मारताना आपण खूप मुक्त, मोकळे असतो अशी आपली समजूत असते; पण ती खरी असते का? आपणाला एकमेकांचे अनेक गुणदोष, एकमेकांच्या जीवनातले बरेवाईट तपशील ठाऊक असतात; त्यामुळे तिथे कधी मोकळ्या गप्पा होत असल्या, तरी अनेकदा नात्यातल्या जवळिकीमुळेच कधीकधी एक चमत्कारिक अवघडलेपणही अनुभवाला येते. एकमेकांची मते, आग्रह, दुराग्रह ठाऊक असल्यामुळे मतभेदाचे अवघड विषय बहुधा आपण शिताफीने टाळतो. वृत्तीतल्या हळव्या जागा, स्वाभिमानाची ठिकाणे माहीत असल्यामुळे बोलताना त्यांना कुठे धक्का लागणार नाही, समोरच्या व्यक्तीचं मन दुखावले जाणार नाही, याची सतत काळजी घ्यावी लागते.

QCA41P